बातमीपत्र
पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर
माहिती कक्ष, दि २० मे २०२४

# विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | २३७/२०२४ भादवि ४१७,४२०,३४ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि ०८/०३/२०२३ ते आजतागायत मौजे मजरेवाडी सर्वे नं १५४/१,आसरा ब्रिजजवळ जुळे सोलापूर,सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि २०/०५/२०२४ रोजी १६.३८ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | सुनिल वसंतराव पोतदार,वय-६५ वर्षे,रा- घरनं ५२५ शुक्रवार पेठ कसबा पोलीस चौकी समोर सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १.अप्पासाहेब उध्दवराव भोपळे २) त्यांचा मुलगा अनिल अप्पासाहेब भोपळे रा- होटगी रोड सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की,यातील फिर्यादीचे काका वामन काशिनाथ पोतदार व यातील आरोपीत क्र १ यांचे वडील उध्दवराव भोपळे हे दोघे मिळून भागीदारी मध्ये प्लॉट विक्री करत होत. मौजे मंजरेवाडी जुळे सोलापूर येथील जुना सर्व्हे नं ३०६/1 व नवीन सर्व्हे नं १५४/1 व जुना सर्व्हे नंबर ३०७/1 व नवीन सर्व्हे नं १५३/1 या दोन गटाचे मुळ मालक उध्दव तात्या भोपळे होते.दिनांक ०७/१२/१९५५ रोजी उध्दव भोपळे यांनी फिर्यादीचे काका वामन पोतदार यांना २६ एकर २० गुंठे ची विक्री केली होती.त्यांचा दस्त क्रमांक १७६४/१९५५ असा आहे.<br>दि ०५/०९/१९९१ मध्ये फिर्यादीचे वडील मयत झाले त्यांचा वारसदार म्हणून फिर्यादी होते.व २५/०३/१९९३ मध्ये फिर्यादीचे काका हे मयत झाले त्यांचे वारदार म्हणून त्यांची ५ मुले होती.सदर दोन्ही गटाच्या ७/१२ उताऱ्यास एकूण ६ वारसांची नावे लागली आहे. तरी देखील यातील आरोपीत मजकूर यांनी यातील मयत उध्दव भोपळे हे मयत झालेले असताना त्यांचे ७/१२ वर नाव लावून ते मयत झाल्याचे पुरावा देवून यातील आरोपी क्र १ हा वारसदार आहे असे ७/१२ वर नाव नमुद केले.<br>तरी दि ०८/०३/२०२३ ते आजतागायत पर्यत एकदरीत वरील आरोपीत मजकूर यांनी गट नंबर १५४/1 यामध्ये दिवाणी न्यायालय,महसुल न्यायालय व फौजदारी न्यायालय अशा विविध स्वरूपाचे वाद विविध न्यायालयात चालू असताना सदर गटामध्ये प्लॉटिग पाडलेले असताना जागेतील हितसंबधीत व्यक्ती मयत झ ाालेली असताना मा.दिवाणी न्यायालयाचा तुर्तातुर्द मनाई आदेश असताना स्वत:च्या आर्थिक फायदयासाठी फिर्यादी या गटामध्ये हितसंबधीत आहे अशी व इतर माहिती सादर न करता पोट हिस्सा मोजणी करून घेवून,पोट हिस्सा मोजणी नकाशा व आदेशाच्या आधारे स्वत:च्या एकटयाच्या नावाने ७/१२ उतारा तयार करून घेवून जागेवर लोखंडी ॲगल व पत्र्याच्या सहाय्याने कब्जा घेवून सदरची जागा विक्री करण्याच्या उद्देशाने इसारा पावती करून वरील आरोपीत मजकूर यांनी फिर्यादीची फसवणुक केली आहे.म्हणून.तपास:- पोसई पोपळभट- **८५३०९७३७३१** |

# विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | २३६/२०२४ भादवि ४०६,४२० प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि १२/०४/२०१८ ते आजतागायत नेहरू नगर विजापूर रोड सोलापूर येथे |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि २०/०५/२०२४ रोजी १५.५७ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | चंद्रकांत केशव पवार,वय-७२ वर्षे,व्यवसाय-सेवानिवृत्त-रा-टी-१७,अर्जुन टॉवर,नेहरू नगर सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | एन.जी.कन्स्ट्रक्शन कंपनीचे मालक नागनाथ दत्तु गायकवाड,रा-घरनं ६१२/६१३,आदित्य नगर विजापूर रोड सोलापूर |
| **फसवणुक र** | | ३५,००,०००/- रूपये. |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की,दि १२/०४/२०१८ ते आजतागायत यातील फिर्यादीच्या पुतण्याचे ओळखीचे एन.जी.कन्स्ट्रक्शन कंपनीचे मालक नागनाथ गायकवाड यांनी फिर्यादीकडून ५ महिन्याकरीता बिनव्याजी रक्कम ३५,००,०००/- रू चेकने दि १८/०४/२०१८ रोजी विश्वास संपादन करून घेतली.ठरलेप्रमाणे रक्कम ५ महिन्यात परत केली नाहीतर त्यांच्या मालकीची सर्व्हे नं ४०१/२,नवीन सर्व्हे नं ५/१/२/८ या गटातील एन.ए.प्लॉट नंबर २५ ते ३० असे प्लॉट त्याचे एकूण क्षेत्र ११८३९.९६ स्क्वेअर फुट फिर्यादीस हॉस्पीटलसाठी जागा विक्री करतो असे सांगून नोटरी करूनही त्यांनी पाच महिन्यात रक्कम परत केली नाही किंवा त्या मोबदल्यात ठरलेप्रमाणे जागा फिर्यादीस विक्री केली नाही.त्यामुळे सदर आरोपीत मजकूर यांनी सुरूवातीपासूनच फिर्यादीची फसवणुक करण्याचा हेतू ठेवून रक्कम प्राप्त करून अन्यायाने विश्वासघात करून अर्थिक फसवणुक केली आहे.म्हणून. तपासः- सपोनि गायकवाड- ९९७०६६३००३ |